# विमा पॉलिसींची तुलनात्मक माहिती मिळण्याची सोय

**म. टा. व्यापार प्रतिनिधी**

विमा व्यवसायात अनेक कंपन्यांनी पदार्पण केले आहे. प्रत्येक कंपनीचे पॉलिसीसंबंधी स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. यामधून आपणास परवडणारी अशी विमा योजना कोणत्या कंपनीची घ्यायची हा प्रश्न सर्वसामान्यास पडतो. अशावेळी योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी गीयर फिनॅन्शियल सर्व्हिसेसने खास वेबसाइट सुरु केली आहे.

www.MyInsuranceClub.com या वेबसाइटवर लाइफ इन्श्युरन्स, हेल्थ इन्श्युरन्स, मोटर इन्श्युरन्स आणि ट्रॅव्हल इन्श्युरन्स अशा चार प्रकारच्या विमा योजनांची तुलनात्मक माहिती मिळू शकेल. यामध्ये कोणत्या कंपनीचा प्रीमियम किती असेल, हेही कळू शकते.